"निंदेला घाबरून आपल
ध्येय सोडू
नका
कारण ध्येय साध्य होताच
निंदा करणाऱ्यांची मत
बदलतात."



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com


बुलडाणा, गुरुवार, दि.०३ जुलै २०२५

## पुण्याच्या भोंदूबाबाचे अश्लील चाळे, उपायाला विरोध केल्यास चिठ्ठीवर तारीख लिहायचा... अन...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पुणे :** भक्तांच्या मोबाइलमध्ये 'हिडन ॲप' डाउनलोड करून त्यांचे खासगी क्षण पाहणारा भोंदूबाबा भक्तांना गुंगीचे औषध देऊन अश्लील चाळेही करायचा. भक्तांचे दोष आपल्या अंगावर घेत असून, त्यांच्या अडचणींवरील उपाय असल्याची बतावणी तो करायचा. एखाद्याने विरोध केल्यास भोंदूबाबा एका कागदावर तारीख लिहून त्या दिवशी भक्ताचा मृत्यू होईल, अशी भीती घालायचा, असे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे.

प्रसाद दादा ऊर्फ बाबा ऊर्फ प्रसाद दादा भीमराव तामदार (वय २९, रा. सूस गाव, मुळशी) असे या भोंदूबाबाचे नाव आहे. त्याच्याविरोधात ३९ वर्षीय व्यक्तीने बावधन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. या गुन्ह्याच्या तपासात पोलिसांनी पाच भक्तांकडे चौकशी केली असता, आरोपी भोंदूबाबाच्या 'हायटेक लीलां'चे किळसवाणे प्रकार उघडकीस आले.



या गुन्ह्यात आरोपी भोंदूबाबाच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्याने त्याला मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीकडून तीन मोबाइल, एक डिजिटल पॅड, सहा पेनड्राइव्ह, चार मेमरी कार्डसह अस्वस्थता आणि निद्रानाशावरील गोळ्यांचे पाकीट जप्त करण्यात आले आहेत. 'आरोपीने भक्तांचे खासगी क्षण 'हिडन ॲप'द्वारे रेकॉर्ड करून लॅपटॉपमध्ये सेव्ह केल्याची माहिती मिळाली असून, हा लॅपटॉप हस्तगत करायचा आहे. आरोपीने पुरुषांप्रमाणेच महिला व लहान मुलांचीही फसवणूक केली असल्याची शक्यता असून, त्यांच्याकडून लाटलेल्या पैशातून मालमत्ता खरेदी केली आहे का, त्याने स्थापन केलेली संस्था कायदेशीर आहे का, यासह विविध मुद्द्यांवर तपास करण्यासाठी आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ करावी,' अशी मागणी तपास अधिकारी उपनिरीक्षक सारंग ठाकरे आणि सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी केली. ती मान्य करून न्यायालयाने आरोपीच्या पोलिस कोठडीत चार दिवसांची वाढ केली.

आरोपी बाबाने भक्ताला नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये मोठे संकट येणार असल्याची भीती दाखवून त्याच्या मोबाइलमध्ये 'हिडन ॲप' डाउनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर त्याला पाण्यातून गुंगीची गोळी देऊन अनैसर्गिक अत्याचार केले. दुसऱ्या भक्ताला गुंगीचे औषध देऊन अश्लील चाळे करताना दोष स्वत:वर घेत असल्याची बतावणी केली.

आणखी एकाला त्याचे दोष दूर करण्यासाठी 'हिडन ॲप' सुरू ठेवून मैत्रिणीशी संबंध प्रस्थापित करण्यास सांगितले. आरोपीच्या चाळ्यांना एका भक्ताने विरोध केला असता, 'तू उपाय अर्धवट सोडून चालला आहे,' असे सांगून एका कागदावर तारीख लिहून त्या तारखेला मृत्यू होईल, अशी भीती घातल्याचे भक्तांनी सांगितले.


## अवैध देशी-विदेशी दारुची तस्करी करणाऱ्या आरोपीविरुध्द कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपुर :** दिनांक ०१ जुलै, २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर चे पथक पोलीस स्टेशन बल्लारपूर हद्दीत अवैध धंदे विरुध्द कारवाईची पेट्रोलींग करीत असतांना मुखबिर कडुन मिळालेल्या गोपनिय माहितीवरून कळमना गावाजवळ नाकाबंदी करून एक महिन्द्रा स्कॉपिओ वाहन क्र. एमएच ३४-सीजे-६५७६ ला थांबवून पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यात अवैध रित्या देशी विदेशी दारु साठा मिळुन आला.

तसेच सदर गुन्हयात पायलटींग करीता वापरलेला वाहन टाटा अल्ट्रोझ क. एमएच३४- सीजे-७३३७ चा चालक सदर वाहन सोडुन पळुन गेला. यावरुन सदर प्रकरणी पो.स्टे. बल्लारपूर येथे अपराध क्रमांक ४६२/२०२५ कलम ६५ (अ), ८५ महाराष्ट्र दारुबंदी कायदान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर गुन्हयात आरोपी नामे नितीन राजन कुंडे वय ३५ वर्ष रा. राजेंद्रप्रसाद वार्ड बल्लारपूर यास अटक करुन त्याचे ताब्यातील वाहनामधील अवैध दारु साठा (१) देशी दारु रॉकेट संत्रा ९० एमएल च्या ३८०० नग निपा किं. १,३३,०००/- रु. (२) बिअर हीवर्ड ५००० ५०० एमएल च्या ७२ टिन किं. ९३६०/- रु. (३) विदेशी दारु इम्पेरियल ब्ल्यू १८० एमएल च्या ४८ नग निपा किं. ८१६०/- रु. (४) महिन्द्रा स्कॉपिओ वाहन क्र. एमएच३४-सीजे-६५७६ किं. १५,००,०००/- रु. (५) टाटा अल्ट्रोझ क्र. एमएच३४-सीजे-७३३७ किं.७,००,०००/- रु.



असा एकुण २३,५०,५२०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पाहिजे असलेला आरोपी नामे सिध्दार्थ उर्फ बापु भास्कर रंगारी रा. कारवा रोड, रविंद्रनगर वार्ड बल्लारपूर याचा शोध घेणे सुरु आहे. गुन्हयाचा पुढील तपास बल्लारपूर पोलीस करीत आहे.


सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सपोनि दिपक कॉक्रेडवार, सफौ स्वामीनाथ चालेकर, पोहवा किशोर वैरागडे, अजय बागेसर, प्रमोद कोटनाके, पोअं शेखर माथनकर, गोपीनाथ नरोटे सर्व स्थानिय गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी केली आहे.

## वारकऱ्यांचे सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज ! उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी ०६ जुलै २०२५ रोजी असून, या आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

आषाढी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी ८ हजार ११७ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, चार अप्पर पोलीस अधिक्षक, २४ पोलीस उपअधिक्षक, ७६ पोलीस निरिक्षिक, ३१२ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ४ हजार ८५० पोलीस अंमलदार व २ हजार ८५० होम गार्ड तसेच ०५ एसआरपीएफ कंपनी, ७ बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके,



- ✻ ८ हजार ११७ पोलीस अधिकारी व कर्मचारी
- ✻ ९ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र
- ✻ आपतकालिन परिस्थिती हातळण्यासाठी १४ प्रशिक्षित कार्ट पथके
- ✻ १० ठिकाणी होडी नियंत्रक पथकाची स्थापना

पंढरपूर शहर व परिसरात तसेच पालखी मार्गावर कोणीही अनधिकृत होर्डिंग लावू नयेत अनधिकृत होर्डिंग लावल्यास संबंधितावर तसेच होर्डिंग छपाई करणाऱ्या विरोधातही कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात येईल. असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी केले आहे.

क्युआरटी चार पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित १४ कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने १० ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत. वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १२ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच सुमारे ३०० सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे.

तसेच वाहतुक नियमनासाठी १४ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भोसले यांनी केले आहे.

## थोडक्यात

### थकीत मानधनामुळे अंगणवाडी मदतनीस आर्थिक संकटात

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०२, कळंब :** डिकसळ (ता.कळंब) येथील अंगणवाडी मदतनीस पंचशिला किरणकुमार मस्के यांनी जानेवारी २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीतील थकीत मानधन मिळण्याच्या मागणीसाठी जिल्हा परिषद धाराशिव येथे दि.२३ जून २०२५ रोजी लेखी अर्ज सादर केला आहे.दहा महिन्यांपासून थकीत असलेले मानधन अद्यापही त्यांच्या खात्यात जमा झालेले नाही.

सौ.मस्के या एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत अंगणवाडी मदतनीस म्हणून कार्यरत असून त्यांनी प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका व तालुका कार्यालयात वेळोवेळी लेखी व तोंडी विनंत्या करूनही अद्याप त्यांच्या अर्जाची दखल घेतलेली नाही. बँक स्टेटमेंट्स व पुरावे दिले असतानाही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने त्या गंभीर आर्थिक संकटात सापडल्या आहेत.

कुंटुंबातील अपघातग्रस्त पती व शिक्षण घेत असलेली मुले, या जबाबदाऱ्यांमुळे सौ. मस्के यांच्यावर संपूर्ण कुंटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आली आहे. त्या सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत जीवन जगत आहेत.

सौ.मस्के यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अर्जाची तातडीने सहानुभूतीपूर्वक दखल घेऊन, संबंधित कालावधीतील मानधन अदा करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ह्या अर्जाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धाराशिव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.धाराशिव,

गटविकास अधिकारी, पंचायत समिती कळंब, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास घाडगे पाटील, सामान्य प्रशासन विभाग, जि.प.धाराशिव यांना दिल्या आहेत.

### केंद्र सरकारला दरवाढ मागे घेण्याची मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२ चंद्रपूर :** दि.१ जुलै २०२५ पासून रेल्वो तिकिट, एटीएम व्यवहार शुल्क, पॅन कार्ड नियम आणि गॅस सिलेंडरच्या दरांमध्ये करण्यात आलेल्या प्रचंड वाढीमुळे सामान्य जनता होरपळून निघत आहे. केंद्रातील मोदी सरकारने घेतलेल्या या अन्यायकारक निर्णयाचा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी तीव्र शब्दात निषेध केला असून, ही दरवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे.

खा. प्रतिभा धानोरकर म्हणाल्या, देशातील जनता महागाईने त्रस्त असताना मोदी सरकारने १ जुलैपासून विविध सेवांवर लादलेली ही दरवाढ म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. रेल्वे हे सामान्य माणसाच्या प्रवासाचे प्रमुख साधन आहे. त्यात वाढ करुन सरकारने गरिबांचा प्रवास आणखी महाग केला आहे. तात्काळ तिकीट बुकींगच्या नियमांमध्ये केलेले बदल आणि ओटीपीची सक्ती यामुळे सामान्य प्रवाशांना, विशेषत: ग्रामीण भागातील लोकांना अडचणीचा सामना करावा लागेल. त्या पुढे म्हणाल्या, एटीएम मधून पैसे काढण्यावरील वाढीव शुल्क हा डिजीटल इंडियाच्या नावाखाली सामान्य नागरिकांच्या खिशातून पैसो काढण्याचा प्रकार आहो. बँका आणि वित्तिय संस्थांना याचा फायदा होईल. पण सर्वसामान्यांसाठी रोख व्यवहार करणे अधिक खर्चिक होईल. पॅन कार्डसाठी आधार अनिवार्य करणे आणि नवीन नियम लागू करणे हे लोकांना अधिक त्रासात टाकणारे आहे. तर, गॅस सिलेंडरच्या दरात वाढ करणे म्हणजे गृहिणींच्या बजेटवर दर महिन्याला महागाईची टांगती तलवार ठेवण्यासारखे आहे. खासदार धानोरकर यांनी ठामपणे सांगितले कि, मोदी सरकार केवळ धनदांडग्या उद्योजकाचे सरकार बनले आहे. त्यांना सामान्य जनतेच्या समस्यांशी काहीही देणे-घेणे नाही. निवडणूकीपूर्वी अच्छे दिनाची स्वप्ने दाखवून आता जनतेला महागाईच्या खाईत लोटले जात आहे. मी मोदी सरकारला विनंती करते कि, त्यांनी तातडीने या सर्व दरवाढीचा निर्णय मागे घ्यावा आणि जनतेला दिलासा द्यावा. अन्यथा कॅांग्रेस पक्ष आणि इतर समविचारी पक्ष जनतेच्या हितासाठी रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करतील, असेही त्या म्हणाल्या.

### येरमाळा येथे जनता दरबार संपन्न

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०२, कळंब :** कळंब तालुक्यातील येरमाळा येथे युवा नेते मल्हार पाटील उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने संकल्प ते सिद्धी अभियानांतर्गत जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. आज जिल्ह्यातील हा ३९ वा जनता दरबार होता. यामध्ये लोकांची लक्षणीय उपस्थिती होती.




आज पर्यंत झालेल्या जिल्ह्यातील जनता दरबारामध्ये एकूण १०३३ तक्रारींची नोंद होऊन निराकरणाची प्रक्रिया चालू आहे. या ठिकाणी प्रमुख उपस्थिती मा. मल्हार दादा पाटील, नेताजी आबा पाटील, अरुण काका चौधरी, विकास बारकुल, आबासाहेब बारकुल, गणेश बारकुल, पोपटदादा जेवे, खंडेराव मैंदाड , राजाभाऊ बांगर, बाबुभाई शेख, संजय अडसूळ, रामकिशन कोकाटे, मदन बारकुल, विशाल बारकुल, सोमनाथ बारकुल यामध्ये प्रमुख खामगाव ते पंढरपूर रस्त्यावरील घाटातील अर्धवट काम पूर्ण करण्यासंदर्भात, येरमाळा चौक ते भीम नगर पर्यंत रस्त्यासोबत नाली नसल्याने होणाऱ्या समस्येबाबत तसेच तेरणा हॉस्पिटल नेरूळ येथे मोफत उपचाराकरिता, उद्योग, कर्ज, रस्ता, नाली, विद्युत पुरवठा, निराधार हप्ता या संदर्भात विविध समस्यांची नोंद झाली.

## संपादकीय

### शिक्षणाची क्रमवारी व आपण

उच्च शिक्षण संस्थांच्या जागतिक मानांकनाच्या क्रमवारीत भारतीय विद्यापीठांच्या संख्येत होत असलेली वाढ अभिनंदनीय असली, तरी यामुळे आपल्याकडील संस्थांचा दर्जा वाढला, असा थेट निष्कर्ष काढून मोकळे होता येणार नाही. दर्जा उंचावण्याची प्रक्रिया निरंतर चालणारी असून, त्यासाठी अजून खूप काही करावे लागणार आहे. अशा क्रमवारीत अव्वल स्थानावर असणाऱ्या संस्था आणि आपल्याकडील पारंपरिक विद्यापीठे यांच्यात थेट तुलना करणे तसे चुकीचे आहे; कारण त्यांना मिळणाऱ्या निधीपासून तेथील शैक्षणिक स्वायत्ततेपर्यंत आणि त्यांच्याकडील सुविधांपासून संशोधनापर्यंत अनेक गोष्टींशी आपण बरोबरी करू शकत नाही. मात्र, या मानांकनाचे निकष समजून घेऊन त्याप्रमाणे पूर्तता करण्याबद्दलची आपल्याकडे जागरूकता वाढते आहे, ही चांगली बाब म्हणावी लागेल.

गेल्या दोन-अडीच दशकांत, शिक्षण संस्थांच्या मानांकनाची जागतिक क्रमवारी हा उच्च शिक्षणात अत्यंत महत्त्वाचा घटक बनला आहे. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांची निवड करण्यास याची मदत होते. विद्यापीठांना अर्थसाह्य करणाऱ्या शासकीय व इतर योग्य संस्थांनाही निधीच्या वितरणासाठी ही क्रमवारी उपयुक्त ठरते. त्यामुळे अशा यादीत भारतीय संस्थांना स्थान मिळणे निश्चितच महत्त्वाचे ठरते. अध्ययन-अध्यापनाबरोबरच संशोधनाला, नवोन्मेषाला, शिक्षण-उद्योग यांच्यातील समन्वय वाढविण्याला अधिकाधिक वाव मिळत गेल्यास आपल्याकडील अधिकाधिक विद्यापीठे या क्रमवारीत येत राहतील. यंदाच्या 'क्यूएस' क्रमवारीत देशातील ५४ उच्च शिक्षण संस्थांचा समावेश झाला असून, गेल्या दहा वर्षांत ही संख्या पाचपटीने वाढली आहे. या क्रमवारीत 'इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ टेक्नॉलॉजी' म्हणजेच आयआयटींचा समावेश ही काही नवीन बातमी नाही. आपल्या आयआयटींचा गुणवत्तेसाठीचा लौकिक पूर्वीपासूनच आहे. यंदाच्या क्रमवारीत बारा आयआयटींचा समावेश असून, दिल्ली आयआयटी जागतिक स्तरावर १२३व्या स्थानी, तर मद्रास आयआयटी १८०व्या स्थानी आहे. यंदाच्या यादीत आठ शैक्षणिक संस्थांचा प्रथमच समावेश झाला आहे. काही केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठे आणि काही खासगी विद्यापीठांचा या यादीत समावेश आहे. मागच्या वर्षीपेक्षा अनेक संस्थांनी आपल्या मानांकनांत सुधारणा केली आहे. अमेरिका, ब्रिटन व चीननंतर जास्तीत जास्त शिक्षण संस्थांचा या क्रमवारीत समावेश असलेला भारत चौथ्या क्रमांकावर आहे. उच्च शिक्षणातील विविध आयामांच्या मोजमापावर आधारित पाहणीतून शिक्षण संस्थांची जागतिक क्रमवारी काढण्याची सुरुवात २००३मध्ये झाली. ॲकॅडमिक रँकिंग ऑफ वर्ल्ड युनिव्हर्सिटी (एआरडब्ल्यूयू), क्वाकेरेली सायमंड्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग (क्यूएस), टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग (टीएचई), वेबोमेट्रिक्स या अनुक्रमे चीन, ब्रिटन व स्पेनमधील संस्थांच्या माध्यमातून मानांकन प्रणाली अस्तित्वात आली. या सर्व संस्थांनी या पाहणीसाठी विद्यापीठांच्या विविध अंगांचा माहितीकोश व संशोधन (विशेषत: शास्त्र आणि तंत्रज्ञान शाखा), शोधनिबंधांचा माहितीकोश यांवरील माहितीचा उपयोग केला. 'क्यूएस' क्रमवारीसाठी शैक्षणिक गुणवत्ता, रोजगारक्षमता, रोजगार देणाऱ्या कंपन्यांचा अभिप्राय, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, संशोधन, शोधनिबंधांची गुणवत्ता, आंतरराष्ट्रीय शिक्षकांचे आदी निकषांवर भर दिला जातो. विद्यापीठातील उपलब्ध शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, संशोधन क्षमता, भागीदारी व विद्यार्थ्यांचा निकाल इत्यादी निकष या सूचक घटकांमध्ये आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी विविधता या नव्या घटकाचा समावेशही यंदा या क्रमवारीसाठी करण्यात आला.

# 'नन्हे फरिश्ते' मुळे फुलले हास्य

घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या - मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी तातातूट झालेली ही मुलं पुण्या - मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम मार्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने ( आर पी एफ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली. या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम



रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई वडिलांपासून तातातूट झालेली, घरातून निघून पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला मुलींना पुन्हा आपले आई वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते. या मोहिमे अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या - मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली. या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले मुली भीक मागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक मागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुलामुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील 'ऑपरेशन मुस्कान' नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहीमे अंतर्गत देखील हजारो मुलामुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या - मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड/पुणे ९९२२५४६२९५**

# हिमायतनगरात चिखलमय रस्त्यांमुळे स्कूल व्हॅन घसरली; विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.०१, हिमायतनगर :** हिमायतनगर शहरातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था ही आता अपघातांचे कारण ठरू लागली आहे. शहरातील विविध भागांमध्ये रस्ते चिखलाने भरलेले असून, मोठमोठे खड्डे वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरत आहेत.

आज सायंकाळी शाळेतुन येणारी विद्यार्थ्यांची एक स्कूल व्हॅन या चिखलमय रस्त्यावरून जात असताना अचानक घसरून रस्त्याच्या कडेला गेली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे पालकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



स्थानिक नागरिकांनी यापूर्वी अनेक वेळा नगरपालिका व प्रशासनाला तक्रारी करूनही रस्त्यांची डागडुजी किंवा सुधारणा करण्यात आलेली नाही. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच जर ही स्थिती असेल, तर पुढील काळात अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

नागरिक व पालक वर्गाचा सवाल आहे की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार? प्रशासनाने तातडीने जागरूक होऊन रस्त्यांची योग्य दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी सध्या नागरिकांमधून होत आहे.

एवढ्या मोठ्या अपघातानंतरही जर प्रशासन शांत बसत असेल, तर उद्याचा मोठा अनर्थ कुणाच्या जबाबदारीवर जाईल? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.

### विठू तुझा भक्त, तुझ्या भक्तीत वेडा

नाम घेता पंढरीचं गाव झाल गोळा
तुझ्या भक्तांचा भक्ती भाव भोळा
पंढरपुरात भरला भक्तांचा मेळा
विठू तुझा भक्त तुझ्या भक्तीत वेडा ..।धृ।

डोक्यावर गाठोड हातात काठी
पंढरीच्या वाटेवर चिखल माती
पाऊल ओढत नेत निघाला
तुझ्या भेटीला रे विठ्ठला
तू घातला त्यांच्या भोवती वेढा....।१।

टाळ मृदुंगाच्या तालावर
झाल्या दाही दिशा दंग
भजनाच्या गोडव्यात
दंगला हरीचा रंग
भक्तांनी ओढावा तुझा रे गाडा...।२।

वारी घेऊन आलो देवा तुझ्या रे दारी
गजबजली पहा कशी रे ही पंढरी
माझा सावळा हरी
करी वारीची राखोळी
आभाळ ही झुकवे तुझ्या चरणी माथा...।३।

कळसाला लावी तू
साऱ्या वारीचा झेंडा
पांडुरंगा तुझ्या नामात
जीवनाचा गोडवा
तुझ्या चरणी वाहतो
मी माझ्या सुखाचा घडा...।४।

**लक्ष्मण गं.वाल्डे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं:-८८८८६०६०६८**

## वाचक पत्र




### सण-उत्सवांच्या शुभेच्छा मातृभाषेतून देऊया !

शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याचा जीआर सरकारने मागे घेतल्याने मराठीप्रेमी जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. प्रत्येकाचे आपल्या मातृभाषेवर प्रेम असतेच; मात्र हे प्रेम वृद्धिंगत होण्यासाठीही आपल्याकडून प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी व्यवहारात मातृभाषेचा अधिकाधिक वापर करणे, भाषेत झालेल्या परकीय शब्दांची घुसखोरी हणून पडणे आणि तिचा सदैव अभिमान बाळगणे या सर्व बाबी आपसूकच व्हाव्यात. गेल्या काही वर्षात मराठी भाषिकांवर इंग्रजीचा प्रभाव वाढताना दिसत आहे. सण-उत्सवांच्या निमित्ताने तो प्रकर्षाने जाणवतो. चातुर्मास सुरु झाला की सण, उत्सव आणि व्रत वैकल्ये सुरु होतात. त्यातही श्रावण महिना म्हटला की सणांचे भांडारच ! हल्लीच्या तरुणाईवर सोशल मीडियाचा अधिक प्रभाव असल्याने सणांच्या निमित्ताने सोशल मीडियाच्या माध्यमांतून शुभेच्छांची मोठ्या प्रमाणात देवाणघेवाण होत असते. मराठी शाळांचा टक्का घसरल्याचा परिणाम आता सणांच्या शुभेच्छातूनही दिसू लागला आहे. व्यावहारिक स्पर्धेमध्ये आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी मराठी पालक पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालतात. त्यामुळे हिंदू धर्मातील सण आणि उत्सव म्हणजे मौज करण्याचा एक दिवस एव्हढीच काय ती ओळख या मुलांना ठाऊक असते. हे सण-उत्सव का साजरे करावेत, त्यामागील शास्त्र काय आहे याचा मागमूसही यांना नसतो. हल्लीचे पालकही ते सांगण्याची तसदी घेत नाहीत. सण हिंदूंचे आणि शुभेच्छा परकीय भाषेतून हे समीकरण योग्य वाटत नाहीत. हिंदू सणांच्या शुभेच्छा आपल्या मातृभाषेतून देण्याचा जो गोडवा आणि त्यामागील आपुलकीची भावना आहे ती परकीय इंग्रजी भाषेतून शुभेच्छा देताना कशी व्यक्त होणार ?

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# डायसाण फाऊंडेशनकडून १०० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०२, शहापूर (ठाणे) :** डायसाण फाऊंडेशन आणि डायसाण ग्रुप ऑफ कंपनीज यांच्या संयुक्त विद्यमाने, वाशिंद पूर्व येथील जिल्हा परिषद शाळा रायकरपाडा तसेच जिल्हा परिषद शाळा शिरवंजे रायकरपाडा येथील १ ली ते ७ वीच्या वर्गातील १०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. डायसाण ग्रुपचा ९ वा वर्धापन दिन आणि नीतू अतुल राठोड हिचा १४ वा वाढदिवस या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम, डायसाण फाऊंडेशनच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त सुरू असलेल्या '३० जून ते १ ऑगस्ट - लोकसेवा पर्वा' अंतर्गत राबविण्यात आला. या काळात शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सामाजिक कार्यांची मालिका



हाती घेण्यात आली आहे. त्याअंतर्गत, काही होतकरू, हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दत्तक घेण्याचा संकल्पही फाऊंडेशनकडून करण्यात आला आहे. रायकरपाडा येथील कार्यक्रमासाठी रवींद्र चंदे (अध्यक्ष, कुणबी महोत्सव प्रतिष्ठान कोकण विभाग), प्रविण बडे, संजय हट्ट, सुभाष काळसकर,पत्रकार सुनील फर्डे, सुजाण वडके, लक्ष्मण मोरे, तसेच शिक्षकवर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिर्वंझे शाळेतील कार्यक्रमात पोलिस पाटील काळूराम फर्डे, मुख्याध्यापक मुरलीधर शिंदे, शिक्षिका पूजा फर्डे, सौ. मेनका शिनारे व इतर ग्रामस्थांचा सहभाग होता. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी नीतू राठोड आणि नेमू राठोड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रेरणादायी विचार व मार्गदर्शन केले. त्यांनी गाणी सादर करत वातावरणात उत्साह निर्माण केला. कार्यक्रमास डॉ. अतुल तारासिंग राठोड यांनी उपस्थित राहून डायसाण फाऊंडेशनच्या कार्याचा आढावा दिला. त्यांच्या मार्गदर्शनात वैशाली राठोड, सुवर्णा चव्हाण, कृष्णप्रताप सिंग,अनुप भगत, मनीष सिंग यांची डायसाण फाऊंडेशन टीम कार्यरत होती. शिक्षण, सेवा आणि समाजप्रेम या त्रिसूत्रीवर विश्वास ठेवत, डायसाण फाऊंडेशनने घेतलेला हा उपक्रम सामाजिक भान जागवणारा आणि प्रेरणादायी ठरला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### महाबळेश्वर अर्बन बँक थकबाकीचे प्रमाण कमी करण्यात यशस्वी




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०२, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर तालुक्याची अर्थवाहिनी असणारी दि महाबळेश्वर अर्बन को ऑप बँक महाबळेश्वर गेली ४ वर्षे ठइख निर्बंधाखाली आहे असे असताना २०२४/२०२५ या आर्थिक वर्षात बँकेने भाग भांडवलात ४९ लाखाची वाढ केलेली आहे. तसेच एन् पी.ए कर्जामध्ये ३ कोटी ६१ लाखाची वसुली करून एनपीएचे प्रमाण कमी केले आहे. बँकेच्या एकूण ठेवीच्या ६६ टक्के रक्कम सरकारी कर्जरोखे व इतर सक्षम बँकेमध्ये आर.बी.आय च्या निर्देशानुसार गुंतवणुकाकेलेल्या आहेत. त्यामुळे बँकेच्या आर्थिक वर्षाचा सी.आर.ए.आर.व नेटवर्थ हा आर.बी.आय च्या नियमानुसार राखण्यात बँकेला यश प्राप्त झाले आहे. एनपीए तील कर्ज वसुलीमुळे संस्थेला चालू आर्थिक वर्षात १ कोटी ५३ लाख नफा झाला आहे. संस्था गेली ४ वर्षे (ड) वर्गात होती ती या आर्थिक वर्षात (क) वर्गात आली आहे. यासाठी संचालक मंडळाने तसेच सेवक वर्गाने प्रयत्न केल्याने बँकेस यश प्राप्त झाले आहे. कर्ज वसुली करणेसाठी बँकेने कठोर कारवाई केली आहे. कर्जदारांची व जामिनदाराची इतर बँकेतील खाती गोठवली तसेच शहरातील मध्यवर्ती ठिकाणी थकबाकीदारांची यादी फ्लेक्सद्वारे लावली थकीत कर्जदारांवर कायदेशीर कारवाई केली. या पुढे कर्जदारांनी कायदेशीर जप्ती, लिलाव व वसुलीची कटू कारवाई टाळणेसाठी थकीत कर्जदारांनी कर्ज रक्कम भरून बँकेस सहकार्य करावे. असे आवाहन चेअरमन, संचालक मंडळाने केले आहे. बँकेने सभासदांसाठी एटीएम आणि क्यूआर कोड तसेच एनएफटी/आरटीजीएस इतर सर्व सुविधा सुरु केलेल्या आहेत. सभासद समुह अपघात विमा योजनेमधून नैसर्गिक आपत्तीमध्ये/रस्त्यावरील अपघातात दिवंगत झालेल्या सभासदांना रु.३ लाख आर्थिक मदत बँकेमार्फत करण्यात येत आहे. बँकेची अशीच प्रगती यापुढे ही होण्यासाठी बँकेचे अध्यक्ष समीर सुतार, उपाध्यक्ष शरद बावळेकर व सर्व संचालक मंडळ तसेच मुख्य व्यवस्थापक फकीर भाई वलगे व सर्व कर्मचारी वृंद सदैव प्रयत्नशील आहेत.

### दिव्यात ठाणे महापालिका प्रशासनाने स्वत: च्या शाळा वाढवाव्यात - ज्योती पाटील (उबाठा)



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, दिवा (ठाणे) :** ठाणे महानगर पालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरात अनधिकृत शाळा आणि अधिकृत शाळा यांच्या संघर्षात विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. ठाणे महापालिका प्रशासनाने दिव्यात स्वतःच्या शाळा वाढविल्यास खासगी शाळांची मक्तेदारी मोडीत निघेल व अनधिकृत शाळा देखील बंद होतील असे स्पष्ट मत ठाकरे शिवसेनेच्या शहर संघटिका ज्योती पाटील यांनी मागणी केली आहे. दिवा शहराची लोकसंख्या वाढली तरी शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास ठाणे महानगरपालिकेचा शिक्षण विभाग असमर्थ ठरले आहे. महापालिकेच्या शाळांची संख्या दिव्यात वाढली नसल्याने येथे दरवर्षी अनधिकृत शाळांची संख्या मात्र वाढत आहेत. यात विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. महापालिका शाळांची संख्या वाढून जर दिवा शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना महापालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश मिळाला तर कोणताही पालक आपल्या पाल्याला अनधिकृत शाळेमध्ये जादाची फी भरून प्रवेश घेणार नाही.

दिव्यातील खाजगी शाळांची फी ही सर्वसामान्य नागरिकांना परवडत नाही. परिणामी येथील अनेक पालक वर्ग आपल्या पाल्याला नाईलाजाने अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश घेतात. एकीकडे महापालिकेच्या शाळा उपलब्ध नाहीत, तर दुसरीकडे खाजगी शाळांची फी सर्वसामान्यांना परवडत नाही. यात पालक वर्ग भरडला जात आहे. दिव्यात असणाया खाजगी शैक्षणिक संस्था या सुद्धा हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या असून त्यांच्याही काही मर्यादा आहेत. तिथेही मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सामावून घेण्याची क्षमता नाही ही बाब लक्षात घेऊन आपण दिवा शहरात महापालिका शाळांची संख्या वाढविणे गरजेचे असून इयत्ता १० वी पर्यंत या नवीन शाळा सुरु करणे अत्यावश्यक आहे. ज्या शाळांना परवानगी किंवा मान्यता देणे शक्य आहे अशा शाळांना तातडीने परवानगी द्यावी त्यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार देखील घ्यावा ही मागणी निवेदनाद्वारे शहर संघटिका ज्योती पाटील यांनी दिवा प्रभाग समितचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांसकडे केली आहे.

याप्रसंगी विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे, शहर संघ अधिकारी ज्योती पाटील, विभाग प्रमुख संजय जाधव, योगेश निकम ,नागेश पवार, रवी रसाळ, संदीप राऊत, विभाग संघटिका सुहासिनी गोलेकर, संगीता मचाडो, भाग्यश्री जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### गहाळ, चोरी झालेल मोबाईल डीसीबी यांच्या हस्ते नागरिकांना वितरित




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०२, कल्याण (ठाणे) :** परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत सपोआ कल्याण विभागातील खडकपाडा पोलीस ठाणे, बाजारपेठ पो. ठाणे, महात्मा फुले पो. ठाणे व कोळसेवाडी पो.ठाणे हद्दीतील नागरिकांचे वापरातील मोबाईल गहाळ/चोरी झाली होते.

नमुद गहाळ चोरी झाल्याबाबत मोबाईल फोनचा शोध घेणे बाबत वरिष्ठांच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्याप्रमाणे अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, संजय जाधव, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांचे मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस ठाणे, बाजारपेठ पो.ठाणे, महात्मा फुले पो.ठाणे व कोळसेवाडी पो.ठाणे मध्ये तांत्रिक ज्ञान असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांची पथके नियुक्त करण्यात आली होती. सदर पथकांनी सीईआयआर या पोर्टलचा वापर करून तांत्रिक विश्लेषन करून खालीलप्रमाणे किंमतीचे गहाळ झालेले/चोरी झालेले मोबाईल हस्तगत करण्यात आलेले आहेत.

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीकडे आमदार दातेंनी शासनाचे वेधले लक्ष

### शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी



> अतिवृष्टीमुळे माझ्या मतदारसंघातील शेती सह, रस्ते पुल, सी.डी. वर्कचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पालकमंत्री विखे साहेबांनी तत्परतेने नुकसानीची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. प्रचंड नुकसान झालेली आहे, शेतकऱ्यांचे झालेले नुकसानाची शासनाने दखल घ्यावी.
>
> **आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर मतदारसंघातील सुपा पासून खडकी, खंडाळ्यासह जिल्ह्यातील विविध भागांत मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नगर तालुक्यातील वाळुंबा नदीला आलेल्या महापुराने मोठ्या प्रमाणावर जनजीवन विस्कळीत झाले असून यामध्ये रस्ते, शेती, पिके, जनावरे तसेच घरांचे म ोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते यांनी महाराष्ट्र विधानसभेत पावसाळी अधिवेशनात नियम २९३ अंतर्गत प्रस्ताव मांडत शासनाचे लक्ष वेधले.

महापुरामुळे अनेक गावांमध्ये नागरिक अडकून पडले होते. आमदार काशिनाथ दाते यांना माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन स्थानिक धाडसी नागरीकांची मदत व प्रशासनाच्या मदतीने नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. मात्र, जलसाठे, रस्ते व शेतजमीनीचे नुकसान होऊन परीसरात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व सामाजिक नुकसान झाल्याचे विदारक चित्र निर्माण झालेले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अतिशय तत्परतेने दुसऱ्याच दिवशी महा पूरग्रस्त भागांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी संबंधित विभागांना तातडीने पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने सर्व विभागांनी अहवाल व झालेल्या नुकसानीची आकडेवारीही सादर केली असून, परीस्थिती पुर्ववत करण्याच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक असलेल्या उपाययोजनांची माहिती ही शासनाकडे पाठवण्यात आलेली असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना आमदार दाते म्हणाले की, शहरांम धील मेट्रो, रस्ते आदी निर्माण करण्यासाठी ज्या प्रकारे चालना दिली जाते, त्याच प्रकारे ग्रामीण विकासाला देखील चालना देणे आवश्यक आहे. वेगवेगळे म हामार्ग बनवताना त्या महामार्गांना जोडल्या जाणाऱ्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरुस्ती व निर्मितीवरही भर देणे आवश्यक आहे, ज्यामुळे शहर व ग्रामीण विकासात तफावत निर्माण होणार नाही. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांचा समतोल विकास साधणे आवश्यक आहे.

एकंदरीत या प्रस्तावाच्या माध्यमातून आमदार दाते यांनी पारनेर-नगर मतदारसंघासह संपुर्ण ग्रामीण भागातील समस्या, अडचणी आणि विकासासाठी आवश्यक उपाययोजनांकडे शासनाचे लक्ष वेधले. ग्राम ीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि आपत्तीग्रस्त भागाच्या व्यवस्थापनासाठी ठोस आणि सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन त्यांनी यामाध्यमातून सरकारला केले आहे.

## मांडओहळ धरणात अल्प पाणीसाठा; मुळा धरण ५० टक्के भरण्याच्या मार्गावर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाची उघडीप असली तरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात काही प्रमाणात पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणात पाणीसाठा वाढत आहे. जिल्ह्यातील मोठे असलेल्या मुळा धरणात ४८ टक्के पाणी जमा झाले आहे. भंडारदरा धरणात ५६ टक्के, तर निळवंडे धरणात ४७.७२ टक्के पाणीसाठा झाला आहे. जून महिन्यात पाऊस कमी असला तरी धरणातील पाणीसाठ्यात लाभक्षेत्रातील का हाईना शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे.

जिल्ह्यात यंदा मे महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. दुष्काळी भागातील अडीच टीएमसी क्षमतेचे सीना धरण यंदा पहिल्यांदाच मे महिन्यातील पावसाने भरले. अकोले तालुक्यातील पिंपळगाव खांड, आंबीत, वाकी ही धरणे भरली. गेल्या पंधरा दिवसांपासून जिल्ह्यातील बहुतांश भागात पावसाने उघडीप दिली आहे.

दुष्काळी पट्ट्यात पेरलेले सुकू लागल्याने शेतकरी चिंतेत आहेत. असे असली तरी मुळा, भंडारदरा, निळवंडे, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याला लाभ असलेल्या पुणे जिल्ह्यातील धरण पाणलोटात जोर कमी असला तरी अधूनमधून पाऊस सुरु आहे. सध्या मुळा, भंडारदरा, निळवंडे व अन्य धरण पाणलोटात नेहमीच्या तुलनेत पन्नास टक्के ही पाऊस पडत नाही. त्यामुळे धरणात पाणी जमा होत आहे.

२६ टीएमसी क्षमतेचे अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठे असलेले मुळा धरण ५० भरण्याच्या मार्गावर आहे. आज (सोमवारी) सकाळी आठ वाजता मुळात ४८ टक्के पाणीसाठा झाला होता. ११ टीएमसी क्षमतेचे भंडारदरा व साडेआठ टीएमसी क्षमतेचे निळवंडे धरण १५ ऑगस्ट च्या आधी दरवर्षी भरत असते.पाऊस सुरू राहिला तर यंदा ही येत्या दीड महिन्याच्या आत ही धरणे भरतील अशी आशा आहे. पाऊस नसला तरी धरणाच्या पाणलोटात पाऊस पडत असल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणात तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव,राहाता, श्रीराम पूर तालुक्यातील अनेक भागांना नाशिक जिल्ह्यातील धरणातून पाणी मिळते. त्या भागातही यंदा चांगला पाऊस असून धरणाचा पाणीसाठा मुबलक असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. दुष्काळी भागातील घाटशीळ पारगाव व बेलापूर (ता.पाथर्डी) कोरडे असून पारनेर तालुक्यातील मांडओहळ धरणात अल्प पाणी आहे.

**धरणातील पाणी साठा -**

मुळा ४८.०० टक्के, भंडारदरा ५५.९० टक्के, निळवंडे ४७.४२ टक्के, आढळा ९०.७५ टक्के, मांडओहळ ८०.९१ टक्के, सीना १०० टक्के, विसापूर ९२.६३ टक्के

## म्हाडाची लॉटरी; नाशिक, छत्रपती संभाजीनगरमध्ये मिळणार फक्त ५ लाखात हक्काचं घर




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, छ.संभाजीनगर :** आपल्या हक्काचं घर असावं ही प्रत्येकाची इच्छा असते. मात्र या महागाईच्या काळात शहरांमध्ये घर घेणं अनेकांना परवडत नाही. अशा लोकांसाठी एक खुशखबर आहे. म्हाडाने नाशिक आणि संभाजीनगर विभागासाठी लॉटरी जाहीर केली आहे. या अंतर्गत छत्रपती संभाजीनगरम ध्ये १३५१ घरे तर नाशिक विभागात १४८५ घरांसाठी लॉटरी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे अल्प उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी केवळ ५ लाख किमतीपासून घरे उपलब्ध केली जाणार आहेत. फक्त त्यासाठी ११ ऑगष्ट पूर्वी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावा लागणार आहे.

नाशिक मध्ये एलआयजी म्हणजे अल्प उत्पन्न गटासाठी १२. ६८ लाख ते १३. ५५ लाख इतक्या किमतीत घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. वडाळा शिवारमधील पार्श्वनाथ प्रोजेक्ट या ठिकाणी ही घरे उपलब्ध असणार आहेत. तसेच अडगाव शिवारम धील प्रणव गार्डनमध्ये ही अल्प उत्पन्न गटासाठी घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्याची किंमत ही ११. ९४ लाख ते १५. ३१ लाख इतकी असणार आहे.

अहिल्यानगर मधील सिव्हिल हुडको, सावेदी या ठिकाणी मध्यम उत्पन्न गटासाठी घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. या घरांची किमत ही फक्त ५.४८ लाख इतकी असणार आहेत.

छत्रपती संभाजीनगरमध्ये किती किंमत?

छत्रपती संभाजीनगरमध्ये पंतप्रधान आवाज योजनेच्या अंतर्गत घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. त्या अंतर्गत नक्षत्रवाडीमध्ये १०५६ घरे असून त्याची किंमत ही १५. ३० लाख रुपये इतकी आहे. चिखलठाणामध्ये १५८ घरे असून त्याची किंमत २७ लाख रुपये इतकी आहे.देवळाई या ठिकाणी १४ घरे असून त्याची किंमत ही १३.१९ लाख ते १६. १९ लाख इतकी आहे.

आनंद पार्कमध्ये १८ घरे असून त्याची किंमत ४. ८५ ते ६. २७ लाख इतकी आहे.चिखलठाणा या ठिकाणी ६ घरे असून त्याची किंमत ही ३४ लाख इतकी आहे.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाईमध्ये ९२ घरे असून त्याची किंमत ही १०. ६५ लाख रुपये इतकी आहे.छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जाहीर सोडत तीन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ हजार १४८ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १६४ सदनिका,२० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ३९ सदनिका/भूखंडांचा समावेश आहे.

नाशिक मंडळातील २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ६३ सदनिका व म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ०४ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे. या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटाकरिता ११४८ सदनिका, अल्प उत्पन्न गटाकरिता २६६ सदनिका, म ध्यम उत्पन्न गटाकरिता ०४ सदनिकांचा समावेश आहे. म्हाडाच्या घरांच्या अर्ज प्रक्रियेचा शुभारंभ ३० जूनला करण्यात आला. या घरांसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही ११ ऑगस्ट २०२५ आहे. तसेच १२ ऑगस्टपर्यंत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे. यानंतर १८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्जांची यादी प्रसिद्ध केली जाईल. २५ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम पात्र यादी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे हक्काचे घर घेऊ इच्छिणार्या अर्जदारांना ही सुवर्णसंधी आहे.

दरम्यान नूतन संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेपास वाव नाही. शिवाय या सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ म ध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही. हक्काचे घर घेऊ इच्छिनार्या अर्जदारांना ही सुवर्णसंधी असून अधिकाधिक नागरिकांनी या सोडतीत सहभाग घ्यावा असे आवाहन म्हाडाच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुणवत्ता विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात साजरा



**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.०२, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुका विकास मंडळ, संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड येथे रत्नागिरी जिल्हा विज्ञान रंजन स्पर्धेतील गुणवत्ता विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ विद्यालयाम ध्ये उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आबासाहेब हुलगे यांनी जिल्ह्यात तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळवलेल्या कुमारी वेदिका दिगंबर वाळुंज व ४ गुणवंत विद्यार्थी यांचे प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ व पदक देऊन अभिनंदन करण्यात आले. या स्पर्धेम ध्ये विद्यालयातून २८१ विद्यार्थी या स्पर्धेमध्ये बसले होते. त्यापैकी २७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे पर्यवेक्षक शांताराम बैकर शिक्षक प्रतिनिधी नरेश म टवणकर ज्येष्ठ शिक्षक तानाजी याचवाड, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष आबासाहेब हुलगे यांनी विद्यार्थ्यांना मिळालेले यश व विज्ञान रंजन स्पर्धेचे म हत्त्व समजावून सांगितले. शेवटी कार्यक्रम ाचे आभार प्रदर्शन विज्ञान शिक्षक महेश गिरी यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आले.

